**दिनांक ०४/०४/२०२३**

# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि. ०४/०४/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा

## घरफोडी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | **बडनेरा अप.क्र. २४९/०२३ कलम ३८० भादंवि** | पवन नगर नवी वस्ती बडनेरा | घटना ता वेळ दि २३/०३/२०२३ चे १५.०० पुर्वी<br><br>दाखल ता वेळ दि ०३/०४/२०२३ चे १६.४५ | अविश प्रकाश भुते वय ३५ वर्षे रा पवन नगर नवी वस्ती बडनेरा अमरावती | निकेश प्रकाश भुते वय ३३ वर्षे रा पवन नगर नवी वस्ती बडनेरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की , फिर्यादीची **आई** ह्या कर्करोग व किडनिचा आजाराने आजारि होत्या व दि २९/०३/२०२३ रोजी मरण पावले मि आईचा साभांळ करत होतो व माझे आइने घरातील आलमारीत ठेवलेले तिच्या मृत्यु पुर्वि दि २३/०३/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा सुमारास आलमारीची चाबी देवुन त्यातील सोन्याचे दागिने पाहुन घे असे म्हटल्यान` मी आलमारी उघडुन पाहले असता मला सोन्याचे दागिने दिसले नसल्याने तसे मी आईला सांगितले तिने मला आलमारीत खालील प्रमाणे सोन्याचे दागिने ठेवले होते १)सोन्याचा गोफ १० ग्रॅम कि अ २८.२५० रु .२) सोन्याचा गोफ ९ ग्रॅम ९०० मि.ली की अ .११.१४२रु ,३) सोन्याचा गोफ १० ग्रॅम ३० मि ली कि अ. १०.३८०,४) सोन्याचा गोफ ८ ग्रॅम ९०० मि.ली कि अ २८.९२५ रु .५) डोरले मनी ०२ ग्रॅम २७०मि.ली कि अ ७७१८ रु ,६) सोन्याचे बिस्कीट ५९ ग्रॅम ५२०मि ली की अ १.५३,२६८,७)सोन्या चे टाप्स कि ०२ ग्रॅम १८० मिली कि अ ६९३१ रु ,८) सोन्याची अंगठी ०२ नग २९ग्रॅम ८३०मिली कि अ .९७.३९५ रु .९) सोन्याची पोत ३१ ग्रॅम ३५०मिली कि अ. ९४८३४ रु ,१०) सोन्याचे लटकन ४ ग्रॅम ८७०मि ली कि अ .१४,७३२ रु ,११) सोन्याचे नेकलेस १० ग्रॅम ९७० मिली कि अं ४५,७५० रु असे एकुन १७९ग्रॅम ३९ मिली एकुन कि ४,९९,३२१ रु चा माल दिसुन आला नाही माझी आइ कर्करोग व किडनी च्या आजारने आजारी होती व तिला इलाजा करीता पैसे लागत असल्याने माझी आई सोबत माझी पत्नी व मुल बाळासह राहत असल्याने आइला पहान्यास सतत येणे जाणे होते दुसर कोणी माझ्या घरात येत नसल्याने माझी व माझ्या आइची खात्री झाली होति कि आलमारीत ठेवलेले सोन्याचे सर्व दागिने माझा लहान भाउ निकेश प्रकाश भुते वय ३२वर्षे रा पवन नगर बडनेरा याने माझे व माझ्या आइच्या समंतिशिवाय आमच्या घरातील लोखंडी आलमारीतुन एकुन १७९ ग्रॅम ३९ मिली एकुन कि अ ४,९९,३२१ रु माल निकेस प्रकाश भुते वय ३२ वर्ष .याने चोरुन नेला असावा असा माझा संशय आहे त्याचेवर कार्यवाही होणेकरीता रिपोर्ट देत आहे अशा फि च्या जबानी रि वरुन सदरचागुन्हा दाखल केला. |
| २ | **गाडगे नगर अप क्र ४६७/२०२२ कलम ४५४, ४५७,३८० भादवी** | **अमरावती** | **दि २९.०३.२०२३ चे दुपारी ०२.०० वा ते दि ३१.०३.२०२३ चे ११.०० वा दरम्यान<br><br>दि ०३.०४.२०२३ चे १८.१२** | **एक महीला** | **अज्ञात इसम** | **हकीकत अशा प्रकारे नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी हे अंगणवाडीच्या रुमला कुलूप लावून गेले दि ३१.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० वा अंगणवाडी केद्र क्र १५९ या रुमला घडून कामकाज करण्याकरीता गेले असता फीला अंगणवाडी केंद्राचे दाराचे कुलूप दिसले नाही व दार लावलेले होते. फी ने दार उघडून आत जावून पाहीले असता रुम मधील एक लोंखंडी आलमारी उघडी दिसली व त्यामधील १. वजन ग्रेडेशन रजीष्टर व्रुध्दी पत्रक दोन जुने , दोन नवीन , २. वार्षीक गोषवार रजीष्टर १० नं , ३. जड वस्तू संग्रह जुने रजीष्टर , ४. जन्म म्रुत्यू रजीष्टर जुने , ५ पुर्व शालेय रजीष्टर ,४. ६ पुरक पोषण आहार रजिस्टर ३ नं, ७. वजन रजीष्टर जुने ११ नं. , ८.स्टील जग १ किं अं. २००/- रु , ९. माठ ठेवण्याची अळणी किं अं १५०/- रु , १० पुर्व प्राथमिक ज्ञान दर्शीका पुस्तके १२ नग , ११. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा लाकडी फ्रेम असलेला अंदाजे २/२ चा फोटो किं अं २००/- रु , १२ भगवान गौतम बुध्द याचा लाकडी फ्रेम असलेले २/२ चा फोटो किं अं २००/- , १३ मुलांची उंची मापण पटटी किं अं २००/- रुअसा एकुण संपुर्ण शासकीय कादपत्रसहीत किं अं १२५०/- रु चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फीचे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र ४६८/२०२२ कलम ४५४, ,३८० भादवी | क्रुष्णा नगर गल्ली न्र २ नगर अमरावती | दि ०३.०४.२०२३ चे दुपारी ०५.०० वा ते ०८.००वा दि ०३.०४.२०२३ चे १८.४९ वा दरम्यान | मयुर हरेशकुमार जयसिंगाणी वय ३० वर्ष व्यवसाय खाजगी रा क्रुष्णा नगर गल्ली न्र २ नगर अमरावती | वय अंदाजे ४० ते ४५ वयोगटातील मजबूत बांध्याची व सडपातळ बांध्याची ३० ते ३५ वयोगटातील महीला २ | हकीकत अशा प्रकारे नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी यांचे घराचे दार उघडे पाहून वय अंदाजे ४० ते ४५ वयोगटातील मजबूत बांध्यच्या एका अनोळखी महीलेने बाहेरुन माझे घरावर पाळत ठेवून तर तिच्या सोबतच्या सडपातळ बाध्ंयाच्या ३० ते ३५ वयोगटातील महीलेने फीचे घरात प्रवेश करुन घरातून दुकानाचे ३५०००/- व कानातील सोन्याच्या ३ ग्रॅम वजनाच्या फुल्या किं अं. ६०००/- रु असा एकुण ४१,०००/- रु चा माल चोरुन नेला अशा फीचे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ४ | राजापेठ ३३६/२०२३ कलम ४५७,३८० भादवी | न्यु स्वस्तिक नगर अमरावती | दि. २३/३//२३ चे रात्री दरम्यान दा. ता. वेळ दि. ०३/०४/२३ चे १३.४० वा. | प्रदीप वसंतराव शिराळकर रा. सिताराम बाबा कॉंलणी शंकर नगर रोड अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चे घरचे पहिल्या मजल्यावरिल दवाखान्याचे लॉंक तोडुन आत मध्ये कोणीतरी अज्ञात चोराने प्रवेश करून वरिल वर्णनाचा मुद्देमाल कपाटातुन चोरून नेला आज रोजी फिर्यादी हे नाशिक वरून अमरावती आल्याने सदरचा गगुन्हा दाखल केला. |
| ५ | कोतवाली अप क्र १४८/२०२३ कलम ३८० भादवि | जफरजिन प्लॉट आदर्श हॉटेल जवळ अमरावती | घटना ता वेळ दि ०१/०४/२०२३ चे ०६.०० वा दाखल ता वेळ दि ०३/०४/२०२३ चे २०.०२ वा | दिनेश अर्जुनदास चौधरी वय ६४ रा. जफरजिन प्लॉट आदर्श हॉटेल जवळ अमरावती | दोन अज्ञात महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्याद हे घ.ता.वेळी व ठिकाणी त्यांचे पत्नी सह योगा करीता HVPM येथे जाण्याकरीता घराबाहेर जात असतांना घराचा समोरील दरवाजा ओडुन कोंडा लावुन योगा करीता HVPM येथे निघुन गेले तेव्हा फि चा मुलगा घरी झोपलेला होता फि हे सकाळी ७.०० वा येगा करुन घरी परत आले असता त्यांनाी घराचा समोरील दरवाजा उघडा दिसला घरात जावुन पाहीले असता समोरील रुममध्ये ठेवलेला १. POCO M२ कंपनीचा मोबाईल त्याचा IMEI NO. ८६३७७००५३१४१३६ किंमत अंदाजे ३०००/- रुपये २. redmi note ५ pro कंपनिचा किंमत अंदाजे ८०००/- रुपये असो एकुण ११०००/- रुपयेचा माल दिसुन आला नाही म्हणुन फि ने मुलाला उठवुन CCTV फुटेज पाहण्यास सांगीतले असता दोन अज्ञात महिला घरात येताना दिसल्या त्यापैकी एक महीला घरा बाहेर उभी व एक महीला घरात येतांना दिसली फिर्यादी यांचे वरील वर्णनाचे मोबाईल अज्ञात महीलांनी चोरुन नेले आहे अशा फि चे दिलेल्या जबानि रिपोर्ट वरुन डि ओ यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल केला. |

## वाहण चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | नांदगाव पेठ अप.क्र.१२५ /२३ कलम ३७९ भादवि | डिसेन्ट स्वागतम अपारमेन्ट पार्कींग जावरकर लॉन पाठीमागे अमरावती | ३१/०३/२०२३ चे ११-०० ते १४-३० वा<br><br>०३/०४/२०२३ चे १७-१० | संजय शालीकरामजी पारवेकर वय ४५ वर्ष धंदा-शेती रा ब्राम्हणवाडा थडी ता चांदुर बाजार जि अम | अज्ञात | मी समक्ष पो.स्टे. ला येवुन जबानी रिपोर्ट देतो कि नमुद पत्यावर कुटुंबासह राहतो व शेती व्यवसाय करतो दि ३१-३-२३ रोजी सकाळी ११-०० वा दरम्यान डिसेन्ट स्वागतम अपार्टमेन्ट पार्किग जावरकर लॉन च्या पाठी मागे येथे राहणारे विजय वानखडे साहेब यांचे कडे भेटी करिता माझे कडे असलेली ड्रिम युगा टु व्हिलर गाडी क्र एम एच २७ बि एस १२६४ काल्या रंगाची ज्यावर लाल पट्टे असलेली कि अं ३०,०००/- रु जिचा ईजीन नं जेसी५८ईटी४२९८१३१ चेंसीस नं एम ई४जे सी५८एफजी टी२९८०६६ अशी असलेली अपार्टमेन्ट चे पार्कीग मध्ये लॉंक करुन उभी करुन साहेबाकडे घरात गेलो तेथील त्याच्या कडील काम आटोपल्या नंतर दुपारी ०२-३० वा दरम्यान गावी जाण्या करिता गाडी जवळ आलो असता ऊभी ठेवलेली गाडी मला तेथे दिसली नाही मी आज पर्यन्त परिसरात व अन्य भागात शोधा शोध केली मिळुन आली नाही शेवटी कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली म्हणुन पुढील कार्यवाही करिता पोस्टे ला रिपोर्ट देत आहे सदरचा गुन्हा दाखल केला. |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ४६९/२३ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि २७-०३-२३ चे २०.३० वा ।<br>दि ०३.०४.२३ चे २०.३९ वा | एक महीला | गोपाल राधो बोडखे वय ४० वर्ष्ा रा खेड | यातील हकीकत अश्या प्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चा मोठा मुलगा रत्नाकर याची प्रकुती ठीक नसल्याने पी डी एम सी दवाखान्यातील वार्ड नं ३ मध्ये भरती होता त्याचे सोबत आरोपी हा सुध्दा गावातून आला होता व आरोपी फी सोबत असताना आरोपी यानी फी हीला म्हटले की तुम्ही जेवन करा यासाठी तगादा लावला व फी हे जेवन करीता बाहेर गेली असता त्याला थोडा वेळ लागला त्यांनी त्याचया ताब्यातील एक मोबाईल किं अं १०००/- रु व नगदी ६०००/- रुपये अशा एका बॅगमध्ये मुला जवळ बेडवर ठेवून गेली होती व परत जेवन करुन आली असता त्याने गावातील त्या आरोपी हा दिसला नाही व त्यांनी त्याला फोन लावल्यासाठी बॅग पाहीले असता बॅग दिसली नाही व मुलाला विचारले असता आरोपी यांनी बॅग व बॅगमधील मोबाईल व पैसे घेवून गेला अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ३ | राजापेठ ३३५/२०२३<br><br>कलम ३७९.३४ भादवी | सिताराम बाबा कॉंलणी शंकर नगर रोड अमरावती | दि. ०३/०४/२३ चे ०७.०० वा दरम्यान दा. ता. वेळ दि. ०३/०४/२३ चे ११.१९ वा. | सुनिल काशिराव साखरकर वय ५० वर्, रा. सिताराम बाबा कॉंलनी शंकर नगर रोड अमरावती | अविनाश सुनिल डोंगरे वय १९ वर्ष रा. शिवाजी नगर अमरावती २) आरोपी क्र. १ चा मित्र नाव माहित नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चे दि. ३/४/२३ चे ०७.०० वा दरम्यान वरिल मुद्देमाल चोरी गेल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने व त्याच्या कामावरिल इसमांनी मिळुन परिसरात पाहणी केली असता आरोपी क्र. १ हा दस्तुर नगर येथिल भंगार दुकाणाजवळ माल विकण्याकरिता फिर्यादीस दिसला फिर्यादीने त्याला माल ओळखुन नाव गाव विचारले असता आरोपी क्र. १ प्रमाणे सांगितले व तेवढ्यात आरोपी क्र. २ हा पळुन गेला फिर्यादीने पोलीसांच्या मदतीने आरोपी क्र. १ ला पो. स्टे. ला आणले अशा फि. चे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | खो. गेट ६०/२३ कलम ३७९, ३४ भा.द.वि. | नवदुर्गा कॉलनी, अंबा नगर अमरावती | ०३/०४/२०२३ चे १४-३० वा. ०३/०४/२०२३ चे १८-४२ वा. | राहुल सुरेश यादव वय ३० वर्ष रा. पार्वती नगर नं. २, हनुमान मदीरा जवळ अमरावती | इंडीगो गाडी क्र. MH-40-2723 मधील दोन अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांचे कडे १२ म्हैस व ३ गाय असुन त्यांचे वडील नेहमी ११-०० वा. गायी म्हशी चारायला नेतात नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीचे वडीलांनी नवदुर्गा कॉलनी, अंबा नगर अमरावती येथील खुल्या मैदानात गायी व म्हशी चारत असतांना एका पांढ-या रंगाच्या इंडीगो चारचाकी गाडी मधुन दोन इसम खाली उतरुन संगणमत करुन फिर्यादी यांची चरत असलेली पांढ-या रंगाची अडीच वर्षाची गाय कि. अं. १०००० रु. ची गाडीत टाकुन चोरुन घेवुन गेले. फिर्यादीचे वडीलांनी सदर गाडीमागे धावुन गाडीचा नंबर पाहीला असता इंडीगो गाडी क्र. MH-40-2723 असा त्यांना दिसला (पुर्ण नंबर माहीत नाही) अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ५ | भातकूली अप नं. 73/2023 कलम 379 भादवि | फि. चे शेत भातकूली रेस्ट हॉउस समोर भातकूलीभाग 1 गट क्र 19 | घटना ता वेळ –दि.03-04-2023 चे 20/00 वा. पूर्वी<br><br>दाखल ता वेळ दि. 03-04-2023 चे 22/09 वा. | श्याम श्रीराम काळे वय 35 वर्षे रा. भातकूली | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमूद घटना ता वेळी व ठिकानी यातील फिर्यादी हे त्याचे शेतात चक्कर मारण्यास दि. 03/04/2023 चे 20/00 वा सूमारास गेले असता त्याना त्याचे शेतात ठेवलेला केबल वॉयर 1000 फूट कि अं. 5000 रु चा शेतात दिसला नाही सदर केबल ईलेट्रिक वायर हा कोणीतरी अज्ञात चोरट्याने दि. 03/04/2023 चे रात्री 08/00 वा. पूर्वी चोरून नेल्याचे फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरून सदरचा गून्हा कलम 379 भादवि चा दाखल केला. |

## स्त्रिअत्याचार

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा **अप क्र २५०/२०२३ कलम ३७६ (n)(२) भादंवि** | **अमरावती** | **दि १८/१२/२०२२ चे ०९.००वा ते दि ०४/०३/२०२३ चे ९.००**<br><br>**दाखल ता वेळ दि ०३/०४/२०२३ चे २०.००** | **एक महीला** | **लोकेश रामकृष्ण रताळ रा अमरावती** | **हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादीला लोकेश रताळे याने फोन केला व म्हणाला की आपण शेगाव येथे देव दर्शना करीता जाउया व मी एस टी बसने अमरावती आली आम्ही बडनेरा येथुन ट्रेन ने शेगाव येथे गेला व दर्शन करुन लोकेश मला म्हणाला की आपण आराम करु म्हणुन शेगाव ये थे वाल्मीक लॉंजवर गेला व गेल्यावर त्याने माझे इच्छा नसतांना माझ्या सोबत त्याने मला लग्नाचे आमीश दाखवुन बळजबरिने माझे सोबत शारीरीक संमध प्रस्तापित केले त्यानंतर बरेच वेळा लोकेश च्या राहते घरी कोणी नसताना मला बोलावुन माझे इच्छे विरुध्द शारीरीक संमध केले लोकेश रामकृष्ण रताळ रा अमरावती मि त्याला लग्णाच म्हटले असता उडवा उडवी ची उत्तर देवु लागला त्याने माझे इच्छा नसतांना माझ्या सोबत त्याने मला लग्नाचे आमीश दाखवुन बळजबरिने माझे सोबत शारीरीक संमध प्रस्तापित केले त्याचे वर कार्यवाही व्हावी करीता मि पोस्टे ला येवुन रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.** |

## विश्वासघात (फसवणुक)

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | **पोस्टे बडनेरा अप.क्र. २४८/२०२३ कलम ४२०,३७९ भादंवि** | HDFC बैंकेचे ATM चाँदणी चौक नवी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि.०२.०४.२०२३ चे १७.३० वा.<br><br>माहिती ता.वेळ - दि.०३.०४.२०२३ चे १३.३० वा.<br>दाखल ता.वेळ - दि.०३.०४.२०२३ चे १५.३३वा. | अशोक श्रावण डोंगरे रा. पवन नगर अंजु कॉलनी नवी वस्ती बडनेरा | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे SBI चे ATM ने HDFC चे ATM मधुन १०,०००/- रु. काढले व त्यांचे ATM कार्ड मशीन मधुन निघत नसल्याने फि.च्या मागे असलेला इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष उंची ५ फुट नाव माहित नाही. याने तुमचे एटीएम काढुन देतो असे म्हणुन फि.कडे पाठ करुन ए.टी.एम.काढले व फि.ला दिले. १८.३६ वा. दरम्यान फि.ला २३,०००/- रु. पैसे काढण्याचा मेसेज आला व पुन्हा ५००/- रु. काढले गेले.पण बैंक बंद झाल्याने मी पोस्टे ला व बैंकेला गेलो नाही. दि. ०३.०४.२०२३ ला १०.०० वा. चौकशी करिता बैंकेत गेलो असता गेलो असता पुन्हा २८०००/- रु. काढण्याचा मेसेज आला व ५००/- रु. असा एकुण ५२०००/- रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करुन फसवणुक केल्याचे दिसुन आले अशा फि.च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग. नं. व दा.ता.वेळ. | धटनास्थळ | मृतकाचे नाव | फिर्यादी | मरनाचे कारण | अकस्मात मृत्यचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **पोस्टे सिटी कोतवाली मर्ग क्र ११/२०२३<br><br>दाखल ता वेळ दिनांक ०३.०४.२०२३ चे २१.४९ वा** | **तहसिल ऑफिस पोस्ट ऑफिस जवळ अमरावती** | **विशाल पुरुषोत्मराव रागेंवार वय ३७ वर्ष रा. गोपाल नगर पोस्टे राजापेठ अमरावती** | **सर तर्फे मपोहेकॉ बेबी पाटील ब नं ११९४ पोस्टे सिटी कोतवाली** | **ब्रॉड डेथ** | **मर्ग क्र हकिकत अशा प्रकारे आहे की आज रोजी आमची २१.०० ते ०८.०० वा पर्यंत स्टे.डा. ड्युटी असतांना चिमोटे ब नं १०३५ यांनी जिल्हा सामान्य रुग्नालय मेमो क्र ४७१३ आणुन दिल्याने मृतक नामे विशाल पुरुषोत्मराव रागेंवार वय ३७ वर्ष यांनी उपचारा करीता आणु असता डॉ.सा. यांनी त्याची तपासणी करुन मृत घोषीत केले सदर मृतकाचे शव हे मरच्युरी मध्ये पीएम होणे मृत्युचे कारण समजुन येण्या करीता शवगृहात राखुन ठेवले वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला तसेच मर्ग तपासा करीता पोहेकॉ संजय आठवले सोबत पोना १३४१ हे रवाना झाले.** |

ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| **१** | **फ्रेजरपूरा अप क्रं २४३/२३ कलम २८५ भा द वि** | **यशोदा नगर चौक अमरावती** | **दि ०३/०४/२३ चे १९/४० वा दाखल ता वेळ ०३/०४/२३ चे २०/५३ वा** | **सर तफ्रे पोउपनि दत्ता नरवाडे पो स्टे फ्रेजरपूरा अम** | **लक्ष्मण बकाराम मडावी वय २९ वर्ष रा यशोदा नगर अम** | **हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे स्टॉफ सह पो स्टे हदीत पेट्रोंलीग करीत असताना नमुद घ ता वेळी व ठिकाणी धोकादायक स्थीतीत ज्वालाग्राही पदार्थाचा हयगीने मानवी जिवन धोक्यात येईल किवा मानवाला नुकसान होवु शकेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने ज्वालाग्राही पदार्थाचा गॅस सिंलेडर सार्वजनीक रोडवर आपल्या फायदयासाठी कृती व्यवसाय करताना मिळुन आला वरून सदर सदर गुन्हा दाखल केला.** |
| **२** | **फ्रेजरपूरा अप क्रं २४४/२३ कलम २८५ भा द वि** | **फरशी स्टॉफ अमरावती** | **दि ०३/०४/२३ चे १९/२० वा दाखल ता वेळ दि ०३/०४/२३ चे २१/१३** | **सर तफ्रे पोउपनि दत्ता नरवाडे पो स्टे फ्रेजरपूरा अम** | **विक्रम विजयसिंह राठोड वय २६ वर्ष रा सबनीस प्लॉट अम** | **हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे स्टॉफ सह पो स्टे हदीत पेट्रोंलीग करीत असताना नमुद घ ता वेळी व ठिकाणी धोकादायक स्थीतीत ज्वालाग्राही पदार्थाचा हयगीने मानवी जिवन धोक्यात येईल किवा मानवाला नुकसान होवु शकेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने ज्वालाग्राही पदार्थाचा गॅस सिंलेडर सार्वजनीक रोडवर आपल्या फायदयासाठी कृती व्यवसाय करताना मिळुन आला वरून सदर सदर गुन्हा दाखल केला.** |
| **३** | **पोस्टे बडनेरा अप.क्र.२४७/२०२३ कलम १३५ भा.वि.का.** | गवळीपुरा अमरावती ता.जि. अमरावती | घटना ता.वेळ - दि.१५.०२.२०२३ चे १३.०० वा.<br><br>माहिती ता.वेळ - दि.०३.०४.२०२३ चे १२.३० वा.<br>दाखल ता.वेळ - दि.०३.०४.२०२३ चे १३.३४ वा. | श्री श्रीकांत कमलाकर देशमुख अति.कार्यकारी अभियंता भरारी पथक अमरावती वय- ५३ वर्ष रा. भरारी पथक विद्युत भवन शिवाजी चौक अमरावती | १)शेख शकील शेख बशीर वय ५५ वर्ष २) शेख समीर शेख रौफ वय- ३४ वर्ष दोन्ही रा. गवळीपुरा अमरावती ता.जि.अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून महावितरण चे एकुण २९१५ युनिट प्रमाणे ८९२४०/- रु. ची विजचोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

**प्रोव्हीशन**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | बडनेरा | अप क्र २५१/२०२३ कलम ६५(इ) म.दा.का | कोडेश्वर फाटा कोंडेश्वर कडे जाणारा रोड | दि ०३/०४/२०२३ चे २०.४० | दि ०३/०४/ २०२३ चे २३.१५ | सरतर्फे पो.हे.का. अब्दुल रहीम अब्दुल कदीर, ब.न२२, पो. स्टे. बडनेरा. | सुमित बंडुराव महल्ले वय २९ वर्षे रा चावडी चौक जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना ४८ नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ३३६०/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| २ | ेनांदगावपेठ | अपं नं १२६/२०२३ कलम ६५ ई मदाका | बोरगाव धर्माळे ता जि अमरावती | दि ३-४-२३ चे १७-०० वा दरम्यान | दि ३-४-२३ चे २२-११ वा | पोहेकाँ राजु काळे बं न ८५७ पोस्टे नांदगावपेठ | एक महीला | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आम्ही दि ३-४-२३ चे १६-०० वा ते २१-०० वा पावेतो आम्ही सोबत नापोकाँ १६४,पोकाँ १५४९ मंपोकाँ १६२१ सह पोस्टे एरीयात प्रो रेड ड्युटी असताना पेट्रोलीग करित असताना १७-०० वा दरम्यान गुप्त बातमीदारकडुन खात्रीलायक बातमी मिळालीकी बोरगाव धर्माळे येथे एक महीला अवैध्य रित्या देशी दारु ची विक्रि करित आहे असा खबरे प्रो रेड केली असता तिच्या ताब्यातुन कापडी थेली मध्ये देशी दारु बाँबी संत्रा १८० एम एल चे ७ नग कि ५६० रु चा माल मिळुन आला तिला पंचा समक्ष मंपोकाँ १६२१ यानी ताब्यात घेवुन जप्त माला पैकी १८० एम एल दारुची शिशी सि ए करिता वेगळी काढली त्यावर आमचे व पंचाचे सहीचेलेबल लावुन जागीच सिल केले सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |